Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date 02 December 2024

Time 11.00 to 11.05 AM

Language Marathi

# आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक: ०२ डिसेंबर २०२४ सकाळी ११.०० वाजता.

****

केंद्र सरकार आरोग्य क्षेत्र सर्वांना परवडण्याजोगे आणि सुलभ करण्याला प्राधान्य देत असल्याचं केंद्रीय मंत्री मनसुख मांडवीय यांनी म्हटलं आहे. मांडवीय यांनी आज सकाळी नवी दिल्ली इथं माध्यमांना संबोधित केलं. देशात २०१४ मध्ये वैद्यकीय महाविद्यालयांची संख्या ३८७ होती, ती आता ७८० एवढी झाल्याचं मांडवीय म्हणाले. आयुष्मान भारत प्रधानमंत्री आरोग्य योजना जगातली सर्वात मोठी आरोग्य योजना असल्याचं त्यांनी सांगितलं. दरम्यान, विकसित भारत युवा नेतृत्व संवादाचं १२ जानेवारी या राष्ट्रीय युवा दिनी आयोजन करण्यात आलं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे या कार्यक्रमाला संबोधित करणार आहेत तसंच युवकांशी संवाद साधणार आहेत, अशी माहिती मांडवीय यांनी दिली.

****

दिल्लीत आगामी विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभुमीवर, भारतीय जनता पक्षानं येत्या आठ तारखेपासून परिवर्तन यात्रेचं आयोजन केलं आहे. ही यात्रा लोकसभेच्या सातही निवडणूक क्षेत्रात होणार असल्याचं प्रदेशाध्यक्ष वीरेंद्र सचदेवा यांनी सांगितलं. ८ ते २० डिसेंबर या कालावधीत ही परिवर्तन यात्रा होईल. दरम्यान, दिल्ली विधानसभा निवडणूक आम आदमी पक्ष आणि काँग्रेस स्वतंत्र लढवणार असल्याचं दोन्ही पक्षाच्या नेत्यांनी काल स्पष्ट केलं.

****

फेंजल चक्रीवादळ धडकल्यानंतर आता परिस्थिती पूर्वपदावर येत आहे. या चक्रीवादळामुळे गेल्या तीन दशकात प्रथमच तामिळनाडूमध्ये मोठा पाऊस झाला. पुद्दुचेरीच्या सखल भागात मोठ्या प्रमाणात पाणी साचल्यामुळे सुमारे ७०० नागरिकांना बचाव शिबीरांचा आश्रय घ्यावा लागला. वीजपुरवठा आणि इंटरनेट सेवा पूर्ववत करण्याचं काम युद्धपातळीवर सुरु आहे.

****

जागतिक एड्स दिनाच्या निमित्तानं हिंगोली शहरात जिल्हा सामान्य रुग्णालय आणि शासकीय परिचारिका प्रशिक्षण केंद्र यांच्या वतीनं काल जनजागृती रॅली काढण्यात आली. शहरातील गांधी चौक परिसरात प्रतिकात्मक मानवी साखळी तयार करून एड्स नियंत्रण संदर्भात माहिती देण्यात आली. यावेळी उपस्थितांनी एड्स नियंत्रणा संदर्भात शपथ घेतली.

****

नांदेड विभागातील दुरुस्तीच्या कामांमुळे, दक्षिण रेल्वे विभागानं १ डिसेंबर ते ३१ डिसेंबर दरम्यान काही रेल्वे गाड्या अंशतः रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. नांदेड – मनमाड रेल्वेगाडी नांदेड ते पूर्णा दरम्यान अंशतः रद्द करण्यात आली असून ती पूर्णा ते मनमाड दरम्यान धावेल. तर मनमाड – नांदेड ही रेल्वेगाडी परतीच्या प्रवासात पूर्णा ते नांदेड दरम्यान अंशतः रद्द करण्यात आली असून मनमाड ते पूर्णा दरम्यान धावेल.

****

भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६ डिसेंबर या महापरिनिर्वाण दिनानिमित्त मुंबईकडं जाणाऱ्या प्रवाशांची संभाव्य गर्दी लक्षात घेऊन मध्य रेल्वेच्या मुंबई, भुसावळ, नागपूर, पुणे आणि सोलापूर विभागातील काही प्रमुख स्थानकावर आजपासून येत्या ९ डिसेंबर दरम्यान प्लॅटफॉर्म तिकिटांच्या विक्रीवर तात्पुरती बंदी घालण्यात आली आहे. प्रवास सुलभ व्हावा यासाठी जेष्ठ नागरिक आणि वैद्यकीय गरजा असलेल्या लोकांना या निर्बंधामधून सूट देण्यात आली आहे.

****

भारतीय क्रिकेट नियामक मंडळ बीसीसीआयचे मावळते अध्यक्ष जय शाह यांनी काल आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषद आयसीसी च्या अध्यक्षपदाची सूत्रं स्वीकारली. या पदावर नियुक्त झालेले ते पाचवे भारतीय आहेत.

****

भंडारा जिल्ह्यात भंडारा–तुमसर महामार्गावर मोहाडी हद्दीच्या शिवारात एमआयडीसी जवळ दुचाकी घसरुन काल झालेल्या अपघातात एका युवकाचा मृत्यू तर एक जण जखमी झाला आहे.

****

राष्ट्रीय जंतनाशक मोहीमेअंतर्गत राज्यात परवा ४ डिसेंबर रोजी अंगणवाडी, शासकीय विद्यालयं, खासगी शाळा आणि महाविद्यालयामध्ये मुलांना जंतनाशक गोळ्या दिल्या जाणार आहेत. या मोहिमेमध्ये १ ते १९ वयोगटातल्या आपल्या

पाल्याला जंतनाशक गोळी दिल्याची नागरिकांनी खात्री करावी असं आवाहन आरोग्य विभागानं केलं आहे.

****

वाचन संस्कृतीला चालना देण्याबरोबरच जगभरात पुण्याची नवी ओळख करण्याच्या उद्देशानं यंदाही राष्ट्रीय पुस्तक न्यासाच्या वतीनं १४ ते २२ डिसेंबर या कालावधीत पुणे पुस्तक महोत्सवाचं आयोजन करण्यात आलं आहे.

****

सिंगापूर इथे सुरु असलेल्या जागतिक बुद्धीबळ स्पर्धेत भारतीय बुद्धीबळपटू डी गुकेश आणि चीनच्या डिंग लिरेन यांच्यातल्या कालच्या सहाव्या डावातही ४६ चालींनंतर बरोबरी झाली आहे. या दोन खेळाडूंमधला सलग तिसरा सामनाही बरोबरीत सुटल्यानंतर दोघांचे गुण ३-३ असे असून दोघेही जगज्जेतेपदापासून ४ पूर्णांक ५ गुण दूर आहेत.

****

आज शेअर बाजार सुरु होताच सेन्सेक्समध्ये घसरण पाहायला मिळाली. बीएसई सेन्सेक्स १३० अंकांनी घसरुन ७९ हजार ६७२ वर आला. तर, निफ्टीत ५० अंकांची वाढ होऊन २४ हजार १४० एवढा झाला.

****